# एकरात १५० टन ऊस !

## करमाळ्याच्या सोगावचे ब्रह्मदेव सरडे ठरलेत ऊस उत्पादकांसाठी आदर्श.




सध्याच्या दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाताना अडचणींचा डोंगर शेतकऱ्यांसमोर उभा आहे. तरीसुद्धा यातून मार्ग काढण्यासाठी शेतकरी राबताना दिसतो आहे. तसेच देशाचा कणा म्हणून जरी शेतकरी ओळखला जात असला तरी आजच्या घडीला तरुण हा या देशाचा मुख्य आधार बनला आहे. असाच एक तरुण युवक वय २६ वर्ष श्री. ब्रम्हदेव नवनाथ सरडे रा. सोगाव (पूर्व) पो. केडगाव ता. करमाळा जि. सोलापूर क्षेत्र ३.५ एकर यांनी एका एकरामध्ये ऊसाचे १५० टन उत्पादन घेऊन युवकांपुढे एक वेगळा आदर्श निर्माण केला.

ऊसाची कमी होणारी उत्पादकता, पाण्याची कमतरता, तंत्रज्ञान वापराचा अभाव, ऊसाचे दर या सर्व बाबींमुळे ऊस शेती शेतकऱ्यांच्या दृष्टीने न परवडणारी होताना दिसते आहे. तसेच ऊस हे आळशी शेतकऱ्यांचे पीक आहे ही मानसिकता काही प्रमाणात बदलत आहे. या सर्व गोष्टींवर मात करण्याच्या हेतूने युवक शेतकरी श्री. सरडे यांनी वापरलेल्या तंत्रज्ञानाचा समावेश या लेखामध्ये शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने करत आहे.

**एकरी १५० टनाचा ऊस पॅटर्न**

**१) पूर्व मशागत :** पूर्वीच्या ऊसाचा पाला कुट्टी करून जमिनीमध्ये गाडणे. त्यानंतर जमिनीची आडवी-उभी नांगरट करणे. रोटरच्या सहाय्याने ढेकळे फोडून रान मोगरणे व जमीन भुसभुशीत करणे. एकरी १५ टन कमीत कमी शेणखत वापरणे.





२) **लागवड :** लागवडीसाठी पाच फुटी सारी पद्धतीचा अवलंब करून एक डोळा पद्धतीने लागण करतात, शक्य नसल्यास ऊसाची सारी न काढता पाच बाय दीड फुटावर लागवड करण्याची तयारी असते. तसेच ऊसाची सारी शक्यतो उथळ ठेऊन सरीच्या वरंब्यावर ऊस लागवड केली जाते. पट्टा पद्धतीवर देखील भर दिल्याचे सरडे सांगतात.

३) **हंगाम :** उसासाठी अधिक उत्पादन देणारा हंगाम म्हणून आड्सालीमध्येच लागण साधारण १५ जुलै ते १५ ऑगस्ट या दरम्यान केली जाते. ऊसाची को- ८६०३२ या जातीची २०१४ मध्ये तर को-एम-२६५ या जातीची २०१५ मध्ये त्यांनी १५० टन एकरी उत्पादन घेतले आहे.

४) **बेणेप्रक्रिया :** ऊस उत्पादनामध्ये प्रत्येक बाबींना विशेष असे महत्व असल्यामुळे श्री. सरडे यांनी बेणेप्रक्रिया करून खत, कीड व रोग यांवर होणाऱ्या खर्चात बचत केली. रासायनिक बेणेप्रक्रिया बावीस्टीन, रोगर, कॉपर ऑक्सीक्लोराइड ३०० ग्रॅम तर जैविक बेणेप्रक्रिया पीएसबी व २ लिटर असिटोबॅक्टर १०० लिटर पाण्यामध्ये केली. यासाठी त्यांनी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे येथून विद्राव्य जिवाणू खताची उपलब्धता करून घेतली.

५) **अन्नद्रव्य व्यवस्थापन :** ऊसासाठी शेतकरी करत असलेल्या नियोजनाला बगल देत श्री. सरडे यांनी वरखते, भरखते व जिवाणू खते ही फक्त मातीतून न देता एका वेगळ्या पद्धतीने वेळापत्रक ठरवून फवारणीद्वारे उत्तम प्रतिसाद मिळतो, हे चांगल्या प्रकारे उत्पन्न घेऊन सिद्ध करून दाखविले. त्यांनी वापरलेल्या रासायनिक खताचे वेळापत्रक खाली दिल्याप्रमाणे आहे.

I. ऊस लागवडी आधी १ महिना डी.ए.पी.-२ बॅग, पालाश- २ बॅग, ह्युमिक ग्रॅन्यूअल्स- २५ किलो

II. दूसरा हप्ता : लागवडी सोबत यूरिया १ बॅग, सुपर फॉस्फेट -१ बॅग, पालाश-२ बॅग, सिलिकॉन ३ बॅग

III. तिसरा हप्ता : दीड महिन्यांनी निंबोळी पेंड -२ बॅग, अमोनिअम सल्फेट- २ बॅग

IV. चौथा हप्ता : ३ महिन्यांनी (बाळबांधणी) यूरिया- १ बॅग, डी.ए.पी.-२ बॅग, पालाश- २ बॅग, ह्युमिक ग्रॅन्यूअल्स- २५ किलो, मायक्रोन्युट्रीयंट ५ किलो, मॅगनेट- १ बॅग

V. पाचवा हप्ता: ४ महिन्यांनी (मोठीबांधणी) यूरिया- १ बॅग, डी.ए.पी.-२ बॅग, पालाश- २ बॅग, ह्युमिक ग्रॅन्यूअल्स- २५ किलो, मायक्रोन्युट्रीयंट ५ किलो, मॅगनेट- १ बॅग

या व्यतिरिक्त ठिबक संचामधून दिलेल्या खताचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

i) ५ महिन्यांनी मोठे मीठ १५ किलो आलटून पालटून ३ वेळा दिले.

ii) ६ महिन्यांनी अमोनिअम सल्फेट- १ बॅग, पालाश-२ बॅग, बायोस्टिम्युलंट २०० मिली

iii) ७ महिन्यांनी यूरिया- १ बॅग, पालाश- २ बॅग, मॅग्नेशिअम सल्फेट- २५ किलो,

iv) ८ महिन्यांनी : फोस्फोरिक ॲसिड ५ लिटर, पालाश-१ बॅग, मायक्रोन्युट्रीयंट २ लिटर, बायोस्टिम्युलंट - २०० मिली

यासोबतच पिकाला फवारणीद्वारे काही खताची मात्रा देऊन भरघोस उत्पन्न घेण्यासाठी निश्चितच फायदा होतो तसेच खताची कार्यक्षमता वाढते व अपव्यव कमी होतो. फवारणीद्वारे दिलेली खते पिकाला तात्काळ लागू होते त्यामुळे श्री. सरडे यांनी वापरलेल्या फवारणीचे तंत्र खाली दिले आहे.

- **फवारणीतील घटक :** १९:१९:१९ - २ किलो, मायक्रोन्युट्रीयंट १ किलो, झाईम- ५०० मिली, बायोस्टिम्युलंट - २०० मिली, २०० लिटर पाण्यामध्ये ३० दिवसांनी, ४५ दिवसांनी व ६० दिवसांनी फवारणी करावी.
- यानंतर ७५ दिवसांनी, ९० दिवसांनी व १२० दिवसांनी २०० लिटर पाण्यामध्ये १९:१९:१९ २ किलो, मायक्रोन्युट्रीयंट



१ किलो, झाईम– ५०० मिली, जी.ए. ३ ग्रॅम व द्रावण, ६ बी. ए.– ३ ग्रॅम व द्रावण यांची फवारणी करतात.

६) **पाणी व्यवस्थापन:** श्री. सरडे यांची ३.५ एकर पैकी २ एकर क्षेत्रावर ठिबक सिंचनाची व्यवस्था असून हंगामानुसार कमी अधिक प्रमाणात पिकाला पाणी देतात. पाणी साचणार नाही परंतु मुळांच्या कार्यक्षेत्रात ओलावा टिकवून ठेवण्यासाठी ठिबकचा वापर करतात. तसेच पाण्याची उपलब्धता असल्यास पाट पाण्याचा वापर एखादे वेळेस करणे अधिक फायद्याचे सरडे यांना वाटते.



७) **ऊस उत्पादनामधील ठळक व महत्वाचे मुद्दे :**

i) समतोल अन्नद्रव्य व्यवस्थापन अतिशय महत्त्वाचे आहे.

ii) अन्नद्रव्यांचा अपव्यव होऊ नये म्हणून ठिबक व फवारणीद्वारे व पिकाच्या अवस्थेनुसार वापर करावा.

iii) ठिबक सिंचनाचा वापर केल्यामुळे उत्पादनात १५ टक्के वाढ दिसून येते.

iv) ऊसासाठी सूक्ष्म अन्नद्रव्यासोबतच सिलिकॉनचा वापर फायद्याचा ठरतो.

v) आंतरमशागतीमध्ये तणनाशकाचा वापर करून बैल चलित बांधणी केल्यास पीक जोमाने वाढते.

vi) ऊस लागवड तंत्रज्ञानाचा वापर करणे शेतकऱ्यांच्या दृष्टीने अधिक हितावह आहे. दोन ओळीतील अंतर वाढवून लागवड केल्यास पिकास हवा, पाणी व अन्नद्रव्य योग्य प्रमाणात मिळतात व वाढ जोमाने होते.

vii) पीक संरक्षणासाठी कीड व रोगांची ओळख करून आवश्यक त्या उपाय योजना केल्यास उत्पादनावर होणारा खर्च कमी होतो.

**श्री. सरडे यांना मिळालेले पुरस्कार**

१) महाराष्ट्र ऊस भूषण २०१४ : महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघ

२) आदर्श ऊस शेतकरी– २०१५ : पाटील बायोटेक प्रा.लि. जळगाव

३) स्मार्ट ऊस शेतकरी २०१४ : जियोलाईफ अग्रोटेक प्रा. लि. मुंबई

लेखक : **डॉ. प्रविण चव्हाण,**
विषय विशेषज्ञ (कृषिविद्या),
**डॉ. दिनेश नांद्रे,** कार्यक्रम
समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र,
मोहोळ, जि. सोलापूर पिन –४१३२१३
फोन (०२१८९) २३३००१

*आळस म्हणजे मी एक प्रकारची आत्महत्या समजतो, कारण आळशी माणसामधील माणूस मरून जातो, त्याच्यामध्ये जिवंत राहिलेली असते ती फक्त पशुता.*

*- सिसरो*

## शेतकरी बंधू व वाचकांसाठी

**आम्ही आपल्याजवळ आहोत, आपल्या परिसरात आहोत, आपल्याच व्यवसायात आहोत. आम्ही आपल्यासारखेच या व्यवसायातील समस्यांतून गेलो आहोत, जात आहोत. आपल्या अशा समस्या–प्रश्न, असतील तर आम्हास जरूर कळवावे. आम्ही आपल्या समस्या सोडविण्याचा आमच्या परीने निश्चित प्रयत्न करू. आम्हाला त्यातून मोठा आनंद, समाधान लाभेल. या समस्या शेत पिकासंदर्भातील असाव्यात.**

**आपण फुल शेती, भाजीपाला, फळबाग, कोरडवाहू शेती पिकविणारे शेतकरी आहोत. प्रत्येक शेतकऱ्याचे शेती पिकविण्यात स्वतःचे असे एक खास विज्ञान असते, तंत्र असते. या विज्ञानाचा आणि तंत्राचा उपयोग करून आपल्या शेतीत त्यांनी भरघोस उत्पादन घेतलेले असते. प्रत्येक शेतकरी हा एक वैज्ञानिकच असतो. शेतातील कामात येणाऱ्या अनंत अडी–अडचणीतून मार्ग काढताना या विज्ञानाची, त्याच्या शेतीच्या कामातील वेगळ्या तंत्राची त्याला मोठी मदत झालेली असते. आपले हे विज्ञान किंवा प्रयोग–तंत्रज्ञान लिखित स्वरूपात आपण मासिकाच्या पत्त्यावर पाठविल्यास आम्ही आमच्या मासिकातून यशोगाथेच्या स्वरूपातून ते प्रसिद्ध करू. ज्ञान दिल्याने त्याची वृद्धी होते, तसेच आपल्या या विज्ञानाचा व तंत्रज्ञानाचा फायदा इतर शेतकऱ्यांनाही होईल.**

**– संपादक, मासिक भूसंवर्धन**